जा.क्र. पोआ/ २८०४ /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय, दिनांक :१४/०४/२०२०

**<u>विषय</u> :- साथीचे रोग प्रतिबंधक कायदा १८९७ च्या कलम २, ३, ४ अन्वये व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ६८ प्रमाणे सर्व संबंधित नागरिकांनी कोरोना विषाणु संसर्ग (कोव्हिड - १९) ला प्रतिबंध घालण्यासाठी मास्क अनिवार्य केलेबाबतचे आदेश ....**

२) ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने साथीचे रोग प्रतिबंधक कायदा १८९७ कलम २,३,४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोरोना २०२० / सीआर/५८/आरोग्य ५ दिनांक १३/०३/२०२० अन्वये कोव्हिड - १९ ला प्रतिबंध व आळा घालण्यासाठी नियम लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. आणि महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १३/०४/२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन सुधारीत आदेशाव्दारे दिनांक २५/०३/२०२० रोजीचे लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक ३०/०४/२०२० अखेर वाढविली आहे.

३) आणि ज्याअर्थी सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ०७/०४/२०२० क्रमांक कोरोना-२०२० /प्रक./५८/आरोग्य ५ महाराष्ट्र कोव्हिड - १९ प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड - १९ उपाययोजना नियम - २०२० अन्वये जारी अधिसुचनेनुसार १) साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार पोलीस आयुक्त यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड - १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

४) आणि ज्याअर्थी सदयस्थितीत अभ्यासपुर्ण निरीक्षणातुन असे आढळुन आले आहे की,अनिवार्य सामाजिक अंतर (सोशल डिस्टन्स) या उपाययोजना व्यतीरिक्त तोंडावर मास्क परिधान केल्याने कोरोना विषाणुचा प्रसार परस्परांशी संपर्क साधणा-या व्यक्तींकरिता कमी होवु शकतो तसेच कोरोना विषाणुच्या प्रसारास आळा बसु शकतो.

५) आणि ज्याअर्थी उपरोक्त बाब विचारात घेता मी अशा निष्कर्षापर्यंत आलो आहे की, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी संचार करणा-या प्रत्येक व्यक्तीस मास्क परिधान करणे आवश्यक बनले आहे.

६) त्याअर्थी **मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा सक्षम अधिकारी शासनाच्या दिनांक ०७/०४/२०२० चे अधिसुचनेव्दारे सक्षम अधिकारी म्हणुन प्राप्त अधिकारान्वये व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे अधिकारानुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनाकामी खालील प्रतिबंधात्मक निर्देशांची अंमलबजावणीचे आदेश **दिनांक १५/०४/२०२० चे ००/०१ वा. ते दिनांक ३०/०४/२०२० चे २४/०० वा. दरम्यान लागु करीत आहे.**

**अ)** सर्व व्यक्तींना/ नागरिकांना कोणत्याही उद्देशाने / हेतुने आणि कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही अधिकारात सार्वजनिक ठिकाणी जसे की, रस्ता, हॉस्पीटल, कार्यालय, बाजारपेठ, इ. ठिकाणी तीन पदरी मास्क (थ्री प्लाय मास्क ) किंवा कापडी मास्क वापरणे अनिवार्य आहे.

**ब)** कोणत्याही व्यक्तीस त्याचे खाजगी किंवा शासकीय वाहनाने वाहतुक किंवा प्रवास करीत असताना मास्क परिधान करणे अनिवार्य आहे.

**क)** कोणत्याही व्यक्तीस वाहन चालवितांना तसेच त्याच्या कोणत्याही कामाच्या ठिकाणी किंवा त्याच्या कार्यालयात तसेच कोणत्याही ठिकाणी काम करताना वरील उल्लेख केले प्रमाणे मास्क परिधान करणे आवश्यक आहे. कार्यालयातील सर्व कर्मचारी यांनी कार्यालयीन प्रवेशापासुन ते संपुर्ण कार्यालय सोडेपर्यंत मास्क परिधान करणे बंधनकारक करणेत येत आहे.

**ड)**कोणीही व्यक्ती किंवा अधिकारी किंवा कर्मचारी कोणत्याही बैठकीस कार्यक्रमास तसेच कामाच्या ठिकाणी विना मास्क उपस्थित राहणार नाही.

**इ)** सर्व कार्यालयामध्ये प्रवेश करणा-या सर्व अभ्यागतांनी नाका - तोंडावर मास्क परिधान करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांना कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नाही.

**ई)** वापरण्यात येणारे मास्क हे केमिस्ट दुकानात उपलब्ध असलेले प्रमाणबध्द असावेत. किंवा घरगुती बनविलेले आणि चांगले धुवुन निर्जंतुकीकरण करुन फेर वापरण्यायोग्य असावेत.

७) सदर आदेशातील निर्देशांचे / सुचनांचे उल्लंघन केल्यास सबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक १४.०४.२०२० रोजी दिलेला आहे.

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :** १४.०४. २०२०